## क्रीडा / सांस्कृतिक विभाग

| अ. क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी | संपर्क कालावधी | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाचे वरिष्ठ अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | क्रीडा संकुलातील मैदान उपलब्ध करुन देणे | क्रीडा अधिकारी | सकाळी १०.०० ते सायं.५.४५वा. | कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर ७ दिवस | उप आयुक्त (क्रीडा) |
| २. | कै. गौरव म्हात्रे कला केंद्र, से.३, सी.बी.डी. बेलापूर समोरील खुला स्टेज उपलब्ध करुन देणे. | क्रीडा अधिकारी | सकाळी १०.०० ते सायं.५.४५वा. | कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर ७ दिवस | उप आयुक्त (क्रीडा) |
| ३. | क्रीडा प्रशिक्षण केंद्रात क्रिकेट / ॲथलेटिक्स प्रशिक्षणासाठी प्रवेश | क्रीडा अधिकारी | सकाळी १०.०० ते सायं.५.४५वा. | अर्ज करुन कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर ७ दिवस (जागा उपलब्धतेनुसार) | उप आयुक्त (क्रीडा) |
| ४. | स्पोर्टस नर्सरी (क्रीडा बालवाडी) मध्ये प्रवेश | क्रीडा अधिकारी | सकाळी १०.०० ते सायं.५.४५वा. | अर्ज करुन कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर ७ दिवस (जागा उपलब्धतेनुसार) | उप आयुक्त (क्रीडा) |
| ५. | क्रीडा शिष्यवृत्ती मिळणे | क्रीडा अधिकारी | सकाळी १०.०० ते सायं.५.४५वा. | अर्ज करुन कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर २ महिने (उपलब्धतेनुसार) | उप आयुक्त (क्रीडा) |

**क्रीडा संकुलातील विविध उपक्रम प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे : -**

१) क्रीडा प्रशिक्षण केंद्र यामध्ये दिल्या जाणाऱ्या क्रिकेट व ॲथलेटिक्स या खेळाच्या ७ ते १६ वयोगटातील मुलामुलींच्या प्रशिक्षणाकरीता प्रवेश अर्जाचा विहित नमुना भरणे आवश्यक

२) या अर्जासोबत : वैद्यकीय दृष्टया पात्र असल्याबाबतचा वैद्यकीय दाखला तसेच जन्मतारखेच्या दाखल्याची छायांकित प्रत / शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र

३) स्पोर्टस् नर्सरीमध्ये प्रवेशासाठी विहीत अर्जभरणे आवश्यक

४) महापालिका क्षेत्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्राविण्यप्राप्त विद्यार्थी खेळाडूंना देण्यात येणाऱ्या क्रीडा शिष्यवृत्ती मागणी अर्जासोबत वास्तव्याचा दाखला, गतवर्षीचे मार्कलिस्ट व खेळाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक

५) क्रीडा संकुलातील मैदान आरक्षणासाठी संबंधित शाळा/विद्यालय, महाविद्यालये, क्रीडा संघटना, क्रीडा संस्था व कंपनी यांनी आपल्या लेटरहेडवर क्रीडा संकुलात अर्ज सादर करावेत

६) मैदान आरक्षण करावयाचे झाल्यास त्याकरीता किमान १५ दिवस अगोदर अर्ज सादर करावा लागेल.

**क्रीडा संकुलातील प्रवेशाबाबत सर्वसाधारण अटी व शर्ती**

१) प्रवेशापूर्वी प्रशिक्षणार्थी पूर्णपणे तंदुरुस्त असल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

२) वैद्यकीय दृष्टया अपात्र असलेल्या मुलामुलींना प्रवेश दिला जाणार नाही.

३) प्रशिक्षणासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांकडे क्रीडा प्रशिक्षण केंद्राने ठरवून दिलेल्या विहित नमुन्यातील स्वतःचे खेळनिहाय एक संपूर्ण क्रीडा गणवेश सेट (स्पोर्टस किट) असणे बंधंनकारक आहे. (मनपा शाळेतील विद्यार्थ्यांव्यतिरिक्त)

४) प्रशिक्षकांनी तसेच क्रीडा संकुलातील अधिकारी/कर्मचारी यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे खेळाडूंना बंधनकारक राहील.

५) प्रशिक्षणार्थी मैदान स्वच्छ ठेवणे, तसेच क्रीडा संकुल सीमाभिंत, प्रवेशद्वार, विद्युत फिटींग, पाण्याची टाकी, नळ, क्रीडा संकुल इमारत व त्याचे भाग यांची नुकसान होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

६) मैदान आवारातील झाडे, हिरवळ यांचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी अन्यथा वृक्ष संवर्धन कायद्यान्वये कायदेशीर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, तसेच प्रवेश रद्द करण्यात येईल.

७) सराव करत असतांना कोणत्याही खेळाडूस इजा अथवा दुखापत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी खेळाडूवर राहील. त्यास नवी मुंबई महानगरपालिका जबाबदार असणार नाही.

८) प्रशिक्षण वेळ व कालावधी -

१) सकाळ सत्र - ७:०० ते ९.०० पर्यंत.

२) सायंकाळ सत्र - ४.३० ते ७.०० पर्यंत

३) सकाळी ६.०० चे अगोदर किंवा संध्याकाळी ७.०० नंतर कोणत्याही खेळाडूस सराव करण्यास परवानगी देण्यांत येणार नाही

४) सराव खेळपट्टी दर आठवडयास मंगळवार ते शुक्रवार या दिवसांकरीताच उपलब्ध राहील

५) क्रीडा संकुलातील मैदान दर सोमवारी बंद ठेवण्यात येईल.

६) पावसाळा कालावधीमध्ये पावसामुळे मैदान ओलसर असल्यास सरावासाठी बंद राहील

७) ज्यावेळेस मैदानात मोठे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतील त्यावेळेस सराव खेळपट्टीचा वापर बंद राहील व त्याऐवजी अन्य दिवस सरावासाठी दिला जाणार नाही.

९) मैदान परिसरात दारु, मादक द्रव्य घेण्यास सक्त मनाई आहे. असे आढळून आल्यास संबंधितांवर योग्य ती पोलीस कारवाई केली जाईल. अशा संस्था/क्लब/कंपनी /खेळाडूंना भविष्यात पुन्हा मैदानात प्रवेश दिले जाणार नाही.

१०) मैदानासंबंधीत अधिकारी, कर्मचारी यांचे सोबत खेळाडू/क्लब/संस्था/कंपनी यांची वर्तणूक सहकार्याची असणे अपेक्षित आहे.